P.T.C. Education Society's

# Sau. Rajanitai Nanasaheb Deshmukh Arts, Commerce & Science College, Bhadgaon Dist- Jalgaon 424105

स्थापना १९७९

www.srndcollege.org.in
www.srndcelibrary.in
bhadgaoncollege@yahoo.com

NAAC Re- Accredited Grade - 'B'

Phone No. (02596)213364
Fax No. (02596) 213464

**Hon'ble. Nanasaheb S.O.Wagh**
*Chairman*

**Dr. N.N.Gaikwad** (M.A. Ph.D.)
*Principal*

## 6.3.1: The institution has performance appraisal system, effective welfare measures for teaching and non-teaching staff and avenues for career development/progression

**Performance Appraisal System adopted as per UGC, Maharashtra Govt. and University Guidelines, Circulars.**

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. : ०२५७-२२५७२७६, २२५७२७७ फॅक्स क्र. : ०२५७-२२५८४०३, ४०६,
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

जा.क्र. कबचीउमवि/ ६१७/२०१९ दि. : १०/०६/२०१९

प्रति,
१) मा. प्राचार्य/संचालक,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नित अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व समाजकार्य तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालये
२) मा. संचालक/विभाग प्रमुख, प्रशाळा व शैक्षणिक विभाग, कबचौ उमवि, जळगाव

**विषय :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १८ जुलै, २०१८ मधील तरतुदीनुसार Academic/ Research Score तपासणी करणेसंदर्भात प्रस्ताव सादर करणे बाबत.

महोदय/महोदया,

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १८ जुलै, २०१८ रोजी विद्यापीठ आणि महाविद्यालयांमधील शिक्षक आणि इतर शिक्षक समकक्ष कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती/पदोन्नती संदर्भात केलेली किमान अर्हता इत्यादीच्या अनुषंगाने निर्गमित केलेली अधिसूचना तसेच महाराष्ट्र शासनाने दि. ८ मार्च, २०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा.कुलगुरू महोदयांनी काढलेले निदेश क्र.४/२०१९ व दि. १० मे, २०१९ च्या शासन शुध्दीपत्राच्या अनुषंगाने विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांना Academic/ Research Score (पूर्वीचे नाव ए.पी.आय.) संदर्भातील नवीन प्रारूप तयार करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या Academic/ Research Score समितीच्या बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. समितीने विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्देशित केलेल्या आणि महाराष्ट्र शासनाने निर्देशित केलेल्या आराखडा व नियमानुसार केलेले नवीन Academic/ Research Score प्रारुप आणि बैठकीचे इतिवृत्त विद्यापीठ अधिकार मंडळ - मा. विद्या परिषदेच्या दि. २५ मे, २०१९ आणि मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. ४ जून, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत माहिती व सहमतीसाठी सादर करण्यात आले होते.

मा. विद्या परिषद आणि मा. व्यवस्थापन परिषदेने मान्यता व सहमती दिल्यानंतर Academic/ Research Score संदर्भात गठीत समितीच्या इतिवृत्तातील शिफारशी व प्रशासकीय दृष्टीकोनातून विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १८ जुलै, २०१८ रोजी विद्यापीठ आणि महाविद्यालयांमधील शिक्षक आणि इतर शिक्षक कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती/पदोन्नती संदर्भात केलेल्या किमान अर्हता इ. अनुषंगाने निर्गमित केलेली अधिसूचना आणि शासन निर्णयाच्या अनुषंगाने नवीन Academic/ Research Score प्रारूप संदर्भात खालीलप्रमाणे सूचना सर्व संबंधितांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी देत आहोत :

**१) API ऐवजी Academic/ Research Score शब्दप्रयोग :**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन अधिसूचनेनुसार शासननिर्णयानुसार ए.पी.आय. (API) ऐवजी ॲकेडेमिक / रिसर्च स्कोअर शब्दप्रयोग असल्याने सर्व ठिकाणी Academic/ Research Score हा शब्दप्रयोग व्हावा

**२ ) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन अधिसूचनेनुसार ॲकेडेमिक/रिसर्च स्कोअर लागू होण्याचा कालावधी :**

विद्यापीठ अनुदान आयोगाची दि. १८ जुलै, २०१८ ची अधिसूचना, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. Misc-2018 /C.R.56/18/UN-1 दि. ८ मार्च, २०१९, अन्वये लागू केला असून या शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरू महोदयांनी काढलेले निदेश (Direction क्र. ४/२०१९) तसेच दि. १० मे, २०१९ च्या शासन शुध्दीपत्राच्या नुसार विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील सर्व शिक्षकांना सदरहू Academic/ Research Score दि. ८ मार्च, २०१९ पासून लागू होणार आहे.

यासंदर्भात शासन निर्णय दि. ८ मार्च, २०१९ मधील मुद्दा क्र. 7.3 नुसार कार्यवाही करावी.

Science College, Bhadgaon
BHADGAON

**३) मुख्य प्रमाण :**

Academic/ Research Score चे प्रस्ताव पाठविताना नियम, सेवाशर्ती इ. साठी विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना दि. १८ जुलै, २०१८ तसेच महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्र. Misc-२०१८ /C.R.५६/१८/UN-१ दि. ८ मार्च, २०१९ व शासनाचे दि. १० मे, २०१९ चे शुध्दीपत्रक हे मुख्य प्रमाण मानले जावे.

**४) महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापक (लेव्हल १० ते ११, ११ ते १२) सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदाकरीता (लेव्हल १२ ते १३A आणि १३A ते १४) प्रस्तावाची प्राथमिक तपासणी :**

महाविद्यालयाच्या IQAC समितीने प्राचार्यांमार्फत संबंधित शिक्षकाची सेवापुस्तिका, ओरिएंटेशन / रिफ्रेशर / इतर कोर्स, पदोन्नतीची तारीख इ. प्रशासकीय बाबी तपासून Academic/ Research Score च्या प्रस्तावाचे गुणांकन बिनचूक करावे.

**५) विद्यापीठ शैक्षणिक विभागांकरीता (प्रस्तावाची प्राथमिक तपासणी) :**

विद्यापीठ प्रशाळा व विभागातील शिक्षकांनी त्यांचे प्रस्ताव संचालक/विभाग प्रमुखांमार्फत सर्वप्रथम प्रशासन विभागात सादर करावेत. प्रशासन विभागाने त्यांची छाननी करून पदोन्नतीच्या तारखा आदि प्रशासकीय बाबी त्यांच्या पातळीवर तपासल्यानंतरच पात्र शिक्षकांचे प्रस्ताव व्याख्याता मान्यता विभागाकडे तपासणीसाठी पाठवावेत. थेट व्याख्याता मान्यता विभागाकडे सादर करू नयेत.

**६) प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही व इतर आवश्यक सूचना:**

i) पर्यावरण संतूलन आणि रक्षणाच्या दृष्टीने कागदाचा कमीत कमी वापर व्हावा यासाठी Academic/ Research Score प्रस्तावाची केवळ ०१ (एक) फाईल (सर्व कागदपत्रांच्या छायांकीत आणि सांक्षांकीत प्रतींसह) व्याख्याता मान्यता विभागास अणुक्रमणिका तयार करून पृष्ठक्रमांकासह, आवश्यक तेथे पताका (Flag)लावून, योग्य त्या सहपत्रांसह सादर करावी. (प्रस्ताव पट्टी किंवा बॉक्स फाईल मध्येच असावा, स्पायरल, कोम्ब, हार्ड बार्यडिंग करू नये.)

ii) प्रस्तावासोबत Academic/ Research Score चा फॉर्म/ अर्जाची जास्तीची एक प्रत (केवळ भरलेला अर्ज, सहपत्र जोडण्याची आवश्यकता नाही.) वेगळी द्यावी. या प्रतीवर Academic/ Research Score तपासणारी समिती स्कोअर देईल व ही प्रत अंतिम स्कोअरसाठी वापरली जाईल.

iii) प्रस्ताव अर्जांची सॉफ्ट कॉपी Academic/ Research Score Form (open आणि पीडीएफ फाईल) dr-approval@nmu.ac.in या ई-मेलला पाठवावी. ई-मेल सोबत सहपत्र जोडू नयेत.

iv) प्रस्तावासोबत आवश्यक तीच शैक्षणिक कागदपत्रे (पीएच्.डी.,नेट.सेट व रिफ्रेशर, ऑरियंटेशन,शॉट टर्म कोर्सेसची) जोडावीत. प्राथमिक, माध्यमिक, दहावी,बारावी, टायपिंग, कॉम्प्युटर, एमएससीआयटी आदि शैक्षणिक कागदपत्रे जोडू नयेत.

v) प्रस्तावातील कागदपत्रं स्व-सांक्षांकित केलेली असावीत.

vi) पर्यावरण रक्षण व कागदाचा कमीत कमी वापर व्हावा यासाठी प्रस्तावाच्या फोटोकॉपी, टायपिंग / फोटोकॉपी हे कागदाच्या दोन्ही बाजूंनी केलेले चालतील. तथापि, कागदपत्रांची द्विरूक्ती टाळावी.

vii) यु.जी.सी. जर्नल्स ज्या ठिकाणी प्रकाशित असतील त्याचा स्क्रिन शॉट / लोकेशन प्रिंट (अद्ययावत तारखेची) लावावी. तसेच प्रकाशित शोध निबंध Refreed Journal मध्ये असेल तर त्या संदर्भातील पुरावा सादर करावा.

vii) महाविद्यालयातील सांघिक कामे/ संघटनात्मक कामे व इतर प्रमाणपत्रं मा. प्राचार्यांमार्फत सादर करावीत.

viii) रिफ्रेशर/ओरिएंटेशन व इतर कोर्सेस यु.जी.सी.नियमाप्रमाणे असल्याची प्राचार्यांनी खात्री करावी.

ix) तपासणीसाठी येतांना अद्ययावत सेवापुस्तिका (Service Book) समितीसमोर सादर करणे आवश्यक राहील. तसेच सेवापुस्तिकेत ज्या ठिकाणी प्रस्तावित पदाच्या पदोन्नतीचा तारखेचा उल्लेख केला असेल (सहसंचालकांचा शिक्का असलेले पृष्ठ) त्या पृष्ठांची सांक्षाकित प्रत प्रस्तावासोबत जोडावी.

.. ३

S.R.N.D. Arts, Comm. & Science College, Bhadgaon
BHADGAON

x) तपासणीसाठी फक्त संबंधित शिक्षकांनी स्वखर्चाने उपस्थित रहावे. IQAC ने तपासलेला प्रस्ताव संबंधित प्राचार्यांनी / विभाग प्रमुखांनी विद्यापीठाकडे अग्रेषित केलेला असल्याने मानवी श्रम व वेळ वाचावा यासाठी प्राचार्यांनी उपस्थित राहण्याची आश्यकता नाही. मात्र यासंदर्भात समिती सदस्यांना काही माहिती घ्यावयाची असल्यास ते प्राचार्यांना दूरध्वनी वरुन विचारू शकतात.

**७) तपासणी शुल्क :**

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार ॲकेडमिक / रिसर्च स्कोअर तपासणी शुल्क रु. १५००/- वरून रु. २०००/- इतके करण्यात आले आहे. सदरहू शुल्क ज्या दिवशी विद्यापीठात ॲकेडमिक / रिसर्च स्कोअर समितीची बैठक असेल त्या दिवशी संबंधित शिक्षकांनी व्याख्याता मान्यता विभागामार्फत चलनाद्वारे सेंट्रल बँक ऑफ इंडिया, विद्यापीठ शाखा येथे भरावयाचे आहे.

**८) UGC Regulation, July 2018 ,शासन निर्णय, ८ मार्च, २०१९ आणि शुध्दीपत्रक १० मे, २०१९ च्या अनुषंगाने Academic/ Research Score प्रस्ताव तपासण्या संदर्भातील कार्यवाही (महाविद्यालयांकरिता)**

Chart - A) Career Advancement Scheme (CAS) for College teachers

| क्र. | पद, लेव्हल | प्रस्ताव तपासणी संदर्भातील कार्यवाही |
|---|---|---|
| 1 | Assistant Professor (Academic Level 10) to Assistant Professor (Senior Scale/Academic Level 11) | महाविद्यालयाच्या IQAC समितीने प्रस्ताव तपासून पुढील कार्यवाही महाविद्यालयाने करावी. विद्यापीठ समितीकडे पाठवू नयेत. |
| 2 | Assistant Professor (Senior Scale/ Academic Level 11) to Assistant Professor (Selection Grade/ Academic Level 12) | |
| 3 | Assistant Professor (Selection Grade/Academic Level 12) to Associate Professor (Academic Level 13A) | |
| 4 | Associate Professor (Academic Level 13A) to Professor (Academic Level 14) | महाविद्यालयाच्या IQAC समितीने प्रस्ताव तपासून विद्यापीठ Academic/ Research Score तपासणी समितीकडे **पाठवावेत**. |

Chart - B) Career Advancement Scheme (CAS) for College Librarians

| क्र. | पद, लेव्हल | प्रस्ताव तपासणी संदर्भातील कार्यवाही |
|---|---|---|
| 5 | College Librarian (Academic level 10) to College Librarian (Senior Scale/Academic level 11) | महाविद्यालयाच्या IQAC समितीने प्रस्ताव तपासून पुढील कार्यवाही महाविद्यालयाने करावी. विद्यापीठ समितीकडे पाठवू नयेत. |
| 6 | College Librarian (Senior Scale/Academic level 11) to College Librarian (Selection Grade/Academic level 12) | |
| 7 | College Librarian (Selection Grade/Academic level 12) to College Librarian (Academic Level 13A) | |
| 8 | College Librarians (Academic Level 13A) to College Librarians (Academic Level 14) | महाविद्यालयाच्या IQAC समितीने प्रस्ताव तपासून विद्यापीठ Academic/ Research Score तपासणी समितीकडे पाठवावेत. |

.. ४



S.R.N.D. Arts, Comm. & Science College, Bhadgaon
BHADGAON

**Chart - C) Career Advancement Scheme (CAS) for College Directors of Physical Education and Sports**

| क्र. | पद, लेव्हल | प्रस्ताव तपासणी संदर्भातील कार्यवाही |
|---|---|---|
| 9 | College Director of Physical Education and Sports (Academic Level 10) to College Director of Physical Education and Sports (Senior Scale/Academic Level 11) | महाविद्यालयाच्या IQAC समितीने प्रस्ताव तपासून पुढील कार्यवाही महाविद्यालयाने करावी. विद्यापीठ समितीकडे पाठवू नयेत. |
| 10 | College Director of Physical Education And Sports (Senior Scale/Academic Level 11) to College Director of Physical Education and Sports (Selection Grade/Academic Level 12) | |
| 11 | College Director of Physical Education and Sports (Selection Grade/Academic Level 12) to College Director of Physical Education and Sports (Academic Level 13A). | |
| 12 | College Director Physical Education and Sports (Academic Level 13A) to Director Physical Education and Sports/College Director Physical Education and Sports (Academic Level 14) | महाविद्यालयाच्या IQAC समितीने प्रस्ताव तपासून विद्यापीठ Academic/ Research Score तपासणी समितीकडे पाठवावेत. |

- ज्या शिक्षकांच्या पदोन्नतीच्या तारखा यापुर्वीच्या UGC Regulations प्रमाणे असतील आणि त्यांना जुन्या नियमाप्रमाणे दि. ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ७.३ नुसार विकल्प अर्ज (Option form) भरून आपला Academic/ Research Score चा प्रस्ताव युजीसीच्या चतुर्थ सुधारणेप्रमाणे (UGC 4th Amendment) प्रस्ताव सादर करावयाचे असतील तर त्यांनी सहायक प्राध्यापक पदावरून सहयोगी प्राध्यापक पदासाठी प्रस्ताव पाठवितांना खालील प्रमाणे कार्यवाही करावी :

| क्र. | पद, लेव्हल | प्रस्ताव तपासणी संदर्भातील कार्यवाही |
|---|---|---|
| 1 | Assistant Professor (Selection Grade/Academic Level 12) to Associate Professor (Academic Level 13A) **(UGC 4th Amdendment )** | महाविद्यालयाच्या IQAC समितीने प्रस्ताव तपासून विद्यापीठ Academic/ Research Score तपासणी समितीकडे पाठवावेत. |

**थेट भरती (Direct Recruitment) साठी प्रस्ताव तपासण्यासंदर्भातील कार्यवाही**

| क्र. | पद, लेव्हल | प्रस्ताव तपासणी संदर्भातील कार्यवाही |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयीन प्राचार्य **(College Principal)** | महाविद्यालयाच्या IQAC समितीने प्रस्ताव तपासून विद्यापीठ Academic/ Research Score तपासणी समितीकडे **पाठवावेत.** |

.. ५

F:\dr.Vadnere\2019\API\UGC Regulation 2018\cirular2019.doc\

S.R.N.D. Arts, Comm. & Science College, Bhadgaon BHADGAON

**Academic/ Research Score प्रस्ताव तपासण्या संदर्भातील कार्यवाही - विद्यापीठ प्रशाळा/विभागांकरिता**

| Chart - D) Career Advancement Scheme (CAS) for University teachers | | |
|---|---|---|
| 1 | Assistant Professor (Academic Level 10) to *Assistant Professor (Senior Scale/Academic Level 11)* | संचालक/विभाग प्रमुखांमार्फत सर्वप्रथम प्रशासन विभागात सादर करावेत, व त्यानंतर प्रशासन विभागाने Academic/ Research Score तपासणी समितीकडे **पाठवावेत.** |
| 2 | Assistant Professor (Senior Scale/ Academic Level 11) to Assistant Professor (Selection Grade/ Academic Level 12) | |
| 3 | Assistant Professor (Selection Grade/Academic Level 12) to Associate Professor (Academic Level 13A) | |
| 4 | Associate Professor (Academic Level 13A) to Professor (Academic Level 14) | |

**९) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रारूप उपलब्ध :**

अॅकेडमिक/ रिसर्च स्कोअर संदर्भातील माहिती, प्रारूप आदि सर्व बाबी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Circular link / Approval Section वर Open/PDF format मध्ये उपलब्ध असतील त्याच प्रमाणे ईमेल सुध्दा पाठविण्यात येतील. संबधितांनी हेच प्रारूप वापरावेत.

**१०) Academic/ Research Score समितीच्या बैठकांबाबत :**

विद्यापीठाच्या विहित नमुन्यातील व समितीने गुणांकन केलेले, व प्राचार्यांमार्फत सादर केलेल्या पात्र शिक्षकांचे प्रस्ताव व्याख्याता मान्यता विभागाकडे सादर केल्यानंतर व्याख्याता मान्यता विभाग Academic/ Research Score समिती अध्यक्षांशी चर्चा करून बैठकीची तारीख निश्चित केली जाईल. मा. समिती अध्यक्षांनी सूचविलेल्या तारखेस प्रशासकीय मंजुरी नंतर प्रस्ताव तपासणीची तारीख संबंधित शिक्षकांना कळविण्यात येईल.

सदर प्रपत्र विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर **Useful Link मध्ये PBAS Proforma and API & ARS Details** वर उपलब्ध करण्यात आले आहे. संबंधितांनी वेळोवेळी या ठिकाणी असलेले सदरहू अद्ययावत प्रारूप घ्यावेत. संकेतस्थळाच्या या भागात Academic/ Research Score संदर्भात होणारे बदल, अधिसूचनेसंदर्भातील सूचना, परिपत्रक आदि माहितीसाठी वेळोवेळी अवश्य भेट द्यावी. **(Path :** http://nmu.ac.in/en-us/usefullinks/pbasproformaandapidetails.asp **)**

येणे प्रमाणे Academic/ Research Score चे प्रस्तावा संदर्भात कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू,

**(ग. ना. पवार)**
उपकुलसचिव, व्याख्याता मान्यता विभाग

<u>सोबत</u> : Academic/ Research Score चे प्रारूप नमूने (Formats) व विकल्प अर्ज (Option Form)

प्रत - माहितीसाठी :
१. मा. उपकुलसचिव, कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव
२. मा. सहा.कुलसचिव, प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव
३. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव
४. मा. कक्षाधिकारी, कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव
५. मा. उपकुलसचिव, वित्त विभाग, कबचौ उमवि, जळगाव

S.R.N.D. Arts, Comm. & Science College, Bhadgaon
BHADGAON